**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **संविधानाच्या माध्यमातून देशानं सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचं ध्येय साध्य केल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन.**
- **भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त देशभरात उत्साह; नागपूरसह विदर्भात अनेक कार्यक्रम आयोजित.**
- **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा राजीनामा राज्यपालांना सुपूर्द; नवीन सरकार स्थापनेपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून पाहणार कामकाज.**
- **नागपुरच्या शालेय सहलीला घेऊन जाणाऱ्या खाजगी बसला अपघात; एका विद्यार्थिनीचा मृत्यू, काही विद्यार्थी गंभीर जखमी.**
- **विदर्भात सर्वत्र थंडीची लाट; नागपुरात किमान तापमान १२ अंशावर.**

संविधान दिन-दिल्ली मुख्य कार्यक्रम

संविधानाच्या माध्यमातून देशानं सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचं ध्येय साध्य केलं, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. संविधान दिनानिमित्त नवी दिल्लीत संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये आयोजित भव्य कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. आपलं संविधान प्रजासत्ताक व्यवस्थेचा पाया असून नागरिकांचा वैयक्तिक आणि सामाजिक स्वाभिमान सुनिश्चित करण्याचं काम याद्वारे होतं, असं त्या म्हणाल्या.

***आज कृतज्ञ राष्ट्र की ओर से मैं संविधान सभा के सदस्य और परिजनों को श्रद्धांजलि अर्पित करती हूं. यह देश का सपना है कि संविधान सभा के अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद ने तथा प्रारूप कमेटी के अध्यक्ष डॉ.बाबासाहेब अंबेडकर ने संविधान निर्माण की यात्रा का मार्गदर्शन किया. बाबासाहेब अंबेडकर ने प्रगतिशील और समाजशील सोच की चाह हमारे संविधान पर अंकित की है. संविधान सभा में बाबासाहेब के ऐतिहासिक संबोधन से यह स्पष्ट होता है कि भारत लोकतंत्र की जननी है. अपने लोकतंत्र के गौरव की इसी भावना के साथ आज हम सब इस विशेष अवसर पर एकत्र हुए हैं.***

याशिवाय, देशातल्या पायाभूत सुविधांची प्रगती आणि महिला सक्षमीकरणासाठी राबवले जाणारे उपक्रम याबद्दल राष्ट्रपतींनी गौरवोद्गार काढले. उपराष्ट्रपती जगदिप धनखड यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं.गेल्या ७५ वर्षात देशानं आर्थिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. देशाला आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळाली आहे, त्यामुळे देशात संविधानाची अंमलबजावणी किती प्रभावीपणे केली गेली हे दिसून येतं असं उपराष्ट्रपती म्हणाले. संविधानाच्याप्रस्तावनेद्वारे प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता आणि न्याययांची हमी दिली जाते, असंही ते म्हणाले. संविधान सभेत विविध विचारधारांचे लोक होते, मात्र त्यांनी एकत्र येत संविधानाची निर्मिती केली. हीच परंपरा आपण सभागृहात पुढे न्यायला हवी, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं. कार्यक्रमाच्या सुरुवातीला देशानं संविधान स्वीकारून ७५ वर्षं झाल्यानिमित्त राष्ट्रपतींच्या हस्ते ७५ रुपयांच्या स्मारक नाण्याचं, तसंच टपालतिकिटाचं अनावरण करण्यात आलं. संविधानाच्या निर्मितीचा इतिहास आणि प्रक्रिया उलगडून दाखवणाऱ्या दोन पुस्तकांचं आनावरणही यावेळी झालं. तसंच संविधानाच्या संस्कृत आणि मैथिली भाषेतल्या प्रतीही यावेळी प्रकाशित करण्यात आल्या.

संविधान दिवस/नागपूर-विदर्भ

भारतीय संविधान दिन आज देशभरात सर्वत्र साजरा होत आहे. ७५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी भारत सरकारनं राज्यघटनेचा स्वीकार केला होता. त्यानिमित्त आजपासून वर्षभर विविध कार्यक्रमाचं आयोजन केलं जाणार आहे. संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय २०१५ ला सरकारने घेतला. संविधानानुसार भारत एक सार्वभौम, समाजवादी,धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक देश म्हणून घोषित करण्यात आला. संविधानाद्वारे देशातल्या नागरिकांना समता, स्वातंत्र्य आणि न्याय यांची हमी देण्यात आली. आज संविधानाचा अमृतमोहत्सव विदर्भात सर्व ठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

भारतीय संविधानास 75 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या वतीन संविधान अमृत महोत्सवानिमित्त 'घर घर संविधान' कार्यक्रमाचा शुभारंभ आज नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन इथं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. घर घर संविधान हा कार्यक्रम वर्षभर राबविण्यात येणार असल्याचं नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी यावेळी सांगितलं.

***

'आमचं संविधान आमचा स्वाभिमान' असं, या वर्षभर चालणाऱ्या अभियानाचं घोषवाक्य असणार आहे. दरम्यान, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती समिती, भारतीय खाण ब्युरोद्वारा, आज नागपूर इथं, I.B.M. मुख्यालयात, ७५ वा संविधान दिन साजरा झाला. त्याचप्रमाणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या, दीक्षांत सभागृहात, त्याचप्रमाणे नागपूर महानगर पालिका, महावितरण कार्यालय, आकाशवाणी नागपूर केंद्रासह सर्व शासकीय आस्थापना मध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेच वाचन करत संविधानाप्रती आपली वाचनबद्धता दर्शविली गेली.

***

भारतीय संविधान दिवसाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधानाच्या सन्मानार्थ युवा ग्रॅज्युएट फोरम व संविधान फाउंडेशनच्या वतीने नागपूरातील अण्णाभाऊ साठे चौक दीक्षाभूमी ते संविधान चौकापर्यंत वॉक फॉर संविधान रॅलीच आयोजन करण्यात आल. न्यूरोलॉजिस्ट पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, माजी सनदी अधिकारी इ. झेड खोब्रागडे, आणि इतर मान्यवरांच्या उपस्थित ही रॅली संपन्न झाली. संविधान दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि उत्तर नागपुरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी नागपुरातील बेझनबाग येथील जनसंपर्क कार्यालय परिसरात संविधानाच्या प्रस्तावीकेच सामुहिक पठण करून संविधान दिन उत्साहात साजरा केला.

***

भारतीय संविधान स्वीकार दिनानिमित्त आज वाशीम शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात संविधान प्रस्तावीकेच वाचन करण्यात आल. यानंतर माजी सैनिकांनी बिगुल वाजवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला सामूहिक मानवंदना दिली. जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस यांच्या हस्ते संविधान सन्मान रॅलीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. वाशीम शहरातून निघालेल्या या रॅलीमध्ये विविध

शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, गृहरक्षक दलाचे जवान, परिचारिका, माजी सैनिक, आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य मोठ्या संख्येन सहभागी होते. यावेळी मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वस्तीगृहातील विद्यार्थिनींनी संविधानाच्या महत्त्वावर आधारित पथनाट्य सादर केलं.

***

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ सलग्नित भारतीय विद्यामंदिर द्वारा संचालित,भारतीय महाविद्यालय,अमरावती इथं देखील आज संविधान दिन संपन्न झाला.

काळजीवाहू मुख्यमंत्री

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पदाचा राजीनामा दिला. १४ व्या विधानसभेचा कार्यकाळ आज संपत असल्यानं शिंदे यांनी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडे मुख्यमंत्री पदाचा राजीनामा सुपूर्द केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री दादा भुसे, मंत्री दीपक केसरकर उपस्थित होते. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कामकाज पहावं असं राज्यपालांनी एकनाथ शिंदे यांना सांगितलं आहे.

हुतात्मांना अभिवादन २६/११

मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात पोलीस जवानांना हौतात्म्य प्राप्त झाल. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्यासह काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज हुतात्मा पोलीस अधिकारी आणि जवानांना पुष्पचक्र वाहून आदरांजली अर्पण केली.

विद्यार्थी बस अपघात

नागपूरच्या शंकर नगरमधील सरस्वती हायस्कूलचे विद्यार्थी वर्धा जिल्ह्यातील हरकुल्स या पिकनिक स्थळाला भेट देण्यासाठी पाच ट्रॅव्हल्-बस ने सकाळी निघाले होते. सकाळी ९ च्या सुमारास हिंगणी मार्गावर देवळी-पेंढरी गावा समोर घाटात, सर्वात मागे असलेली ट्रॅव्हल्स वळण घेताना, चालकाचे नियंत्रण सुटल्याने उलटली.

यात एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाला आहे. अपघातग्रस्त बस मध्ये विद्यार्थी आणि शिक्षक असे ५० पेक्षा जास्त प्रवासी होते. या अपघातात अर्ध्यापेक्षा जास्त प्रवासी जखामी झाले. १ मुलगी आणि १ शिक्षिका गंभीर जखमी असल्याने त्यांना आणि इतर जखमींना एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर किरकोळ जखमींना ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आलं आहे.

हवामान

नागपुरात थंडीचा जोर चांगलाच वाढला असून गेल्या 24 तासात नागपुरात बारा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. नागपूर पाठोपाठ गोंदिया इथं बारा पूर्णांक दोन अंश इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. याशिवाय विदर्भात सर्वत्रच थंडीची लाट असून वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, अकोला, बुलढाणा या जिल्हयांमध्ये किमान तापमान 13 ते 14 अंश सेल्सिअस दरम्यान राहिलं. तर अमरावती इथं 14 पूर्णांक 9 अंश इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. तर अकोला इथं सर्वाधिक ३० पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. आगामी काही दिवस विदर्भात सर्वत्र हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवला आहे.

*******